## प्रेसनोट दि. ०१.०७.२०२१

श्री. सुमित श्रीमंत वाघमारे वय २१ वर्ष कंत्राटी वायरमन, ३३/११ के.व्ही. एमएसईबी सबस्टेशन देशिंग (हरोली) व श्री. गणेश राजाराम भोसले वय २३ वर्ष, कंत्राटी वायरमन ३३/११ के.व्ही. एमएसईबी सबस्टेशन देशिंग (हरोली)दोन्ही रा. खरशिंग ता. कवठेमहंकाळ जि. सांगली यांनी लोकसेवक श्री. विजय परदेशी शिपाई (वसूली कर्मचारी) एमएसईबी विभागीय कार्यालय कवठेमहंकाळ ता. कवठेमहंकाळ जि. सांगली यांचेकरीता ४५००/- रूपये व स्वतः करीता ५००/- अशी लाच मागणी करून लाच स्विकारले बाबत कारवाई सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे रहिवासी विज कनेक्शन थकीत विज बिला पोटी कायम स्वरूपी तोडण्यात आले होतो. सदरचे कनेक्शन तात्पूरते सुरू करून देण्याकरीता एमएसईबी सब स्टेशन हरोली येथील कंत्राटी वायरमन श्री. सुमित वाघमारे यांनी तक्रारदार यांचेकडे स्वतः करीता ५००/- रूपये व परदेशी साहेब वसूली अधीकारी यांचेकरीता ४५००/- रूपये लाच मागणी करीत असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.२९.०६.२०२१ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयात दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक ३०.०६.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये तक्रारदार यांचे तोडण्यात आलेले विज कनेक्शन तात्पूरते सुरू करून देण्याकरीता एमएसईबी सब स्टेशन हरोली येथील कंत्राटी वायरमन श्री. सुमित वाघमारे व श्री. गणेश भोसले, कंत्राटी वायरमन यांनी तक्रारदार यांचेकडे स्वतः करीता ५००/- रूपये व परदेशी साहेब वसूली अधीकारी यांचेकरीता ४५००/- रूपये अशी एकूण ५०००/- रूपये लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दि.०१.०७.२०२१ रोजी तक्रारदार यांचे व्यवसायाच्या ठिकाणी सापळा लावला असता श्री. सुमित श्रीमंत वाघमारे वय २१ वर्ष कंत्राटी वायरमन, ३३/११ के.व्ही. एमएसईबी सबस्टेशन देशिंग (हरोली) यांचे सांगणेवरून श्री. गणेश राजाराम भोसले वय २३ वर्ष, कंत्राटी वायरमन ३३/११ के.व्ही. एमएसईबी सबस्टेशन देशिंग (हरोली) यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून ५०००/- रूपये लाच रक्कम स्विकारली असताना दोघांना ताब्यात घेण्यात आले असून त्यानंतर लोकसेवक श्री. विजय परदेशी शिपाई (वसूली कर्मचारी) एमएसईबी विभागीय कार्यालय कवठेमहंकाळ ता. कवठेमहंकाळ जि. सांगली यांचा देखील सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्या अनुषंगाने श्री. सुमित श्रीमंत वाघमारे वय २१ वर्ष कंत्राटी वायरमन, ३३/११ के.व्ही. एमएसईबी सबस्टेशन देशिंग (हरोली) व श्री. गणेश राजाराम भोसले वय २३ वर्ष, कंत्राटी वायरमन ३३/११ के.व्ही. एमएसईबी सबस्टेशन देशिंग (हरोली)दोन्ही रा. खरशिंग ता. कवठेमहंकाळ जि. सांगली यांनी लोकसेवक श्री. विजय परदेशी शिपाई (वसूली कर्मचारी) एमएसईबी विभागीय कार्यालय कवठेमहंकाळ ता. कवठेमहंकाळ जि. सांगली यांचे विरुध्द कवठेमहंकाळ पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव श्री. अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, सुहास नाडगौडा सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार अविनाश सागर, संजय संकपाळ, सलिम मकानदार, संजय कलगुटगी, प्रितम चौगुले, भास्कर भोरे, सिमा माने, राधिका माने चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अँप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अँप - www.acbmaharashtra.net
२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB
३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो सांगली.